(4) June 2023 N.S.S.

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये — Rs. 100

रु. 100 — ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ 57AA 438678

अनु. क्र. ६८७४२ दि. २१/६/२०२३
सौ./श्री. विजय कुबेरदास खोमणे
यांनी रुपये १०० या जनरल स्टॅम्प
मानितलेकरून हा रुपये १०० चा
स्टॅम्प व भरतीस रुपये — चा
— या कारणासाठी स्टॅम्प दिला.

श्री. बलभिम रामचंद्र आयवळे
मुद्रांक विक्रेता परवाना क्र. १०९/२०००
रा. ४००/७, बेगम पेठ, सोलापूर.
मो. नं. ९४२०७८०५७५ कोड नं. २५११००४

कोषागार कार्यालय सोलापूर
21 JUN 2023
मुद्रांक प्रमुख लिपिक/उपलेखापाल

## महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र व विद्यापीठ यांच्या दरम्यान करारनामा

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या दरम्यान राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याबाबत हा सामंजस्य करार करण्यात येत आहे.

**पक्ष क्रमांक १.**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सोलापूर, 1608/09, शोभा नगर, सात रस्ता, सोलापूर 413003 येथे स्थित आहे.

या कार्यालयाचे उद्दिष्ट राज्यातील गरजू महिला व बालकांचे संरक्षण व इतर विकासात्मक योजना मार्फत त्यांचे संगोपन, शिक्षण, संरक्षण व पुनर्वसन करणे

**पक्ष क्रमांक 2.**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हि एक शैक्षणिक संस्था असून दिनांक 2004 पासून कार्यरत आहे. सदर संस्थेचे मुख्य उद्दिष्ट हे.....उच्च शिक्षण.............. आहे. संस्थेमार्फत आतापर्यंत ..........अनेक विविध....................प्रकारचे उपक्रम करण्यात येतात. संस्थेचे मुख्य कार्यालय ज्ञानतीर्थ नगर, केगाव, सोलापूर – पुणे महामार्ग, सोलापूर- 413255 येथे आहे.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सोलापूर व विद्यार्थी निधी ट्रस्ट संस्था यांचा उल्लेख यापुढे व्यक्तिगत रित्या "पक्ष" म्हणून केला जाईल.

महाराष्ट्र राज्यातील १५ ते २५ वयोगटातील मुलींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे व हिंसाचाराच्या विरुद्ध त्यांचे मनोबल उंचावणे यासाठी राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जाणार आहे. हा प्रकल्प '**स्वसंरक्षण (Selfdefence)**'संकल्पनेवर आधारित असेल.

प्रास्तावीक - महिला व मुलींवरील होणारे हिंसाचार हे समाजातील विकृती अधोरेखीत करतात. या हिंसाचाराचा प्रतिकार करण्यासाठी मुली व महिलांची शारिरीक व मानसिक स्थिती सक्षम नसल्याने हिंसाचार करणाऱ्या प्रवृत्तीना एकप्रकारे बळ मिळताना दिसते. हिंसाचर, अत्याचार करणाऱ्या पुरषांचा शारिरीक दृष्टया प्रतिकार करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्य व मनोबल याचा मुली व महिलांमध्ये अभाव असल्याने त्या सहजरित्या अत्याचाराच्या बळी ठरतात. बदललेल्या काळात मुलींच्या भावनांशी खेळुन त्यांना जाळयात अडकवणे, त्याचे शारिरीक व मानसिक शोषण करणे आणि वेळ प्रसंगी त्याची क्रुररित्या हत्या करण्याचे प्रकार घडताना दिसत आहेत. समाजमाध्यमे व प्रसार माध्यमे यांचा वाढलेला वापर, सहजरित्या होणारा संपर्क व त्यातुन निर्माण होणारे नाते संबंध हे फारच गतिमान रित्या होत असल्याने आपण कुठल्या संकटात अडकणार आहोत, या आधारे आपला गैरफायदा घेतला जाऊ शकतो, व वेळ प्रसंगी आपल्याला जीवही गमवावा लागेल याची कोणतीही कल्पना नसलेल्या शाळकरी, महाविद्यालयीन व करिअर घडविण्यासाठी घराबाहेर पडलेल्या मुली यांना संभाव्य धोक्यांची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्या सजग होतील आणि कोणत्याही जाळयात अडकण्यापासुन स्वतःला सावरतील यासाठी व्यापक स्वरुपात उपाय योजना करणे गरजेचे आहे.

मुली व महिला वरील हिंसाचाऱ्याच्या घटना घडल्यानंतर समाजमन हळहळते. मात्र यासाठी व्यापक व कायमस्वरुपी उपाययोजना आखताना दिसुन येत नाही. शासन स्तरावरुन होणाऱ्या प्रयत्नास समाजातील विविध घटकांनी सहकार्य करणे व विविध उपक्रमांमध्ये सहभागी होणे ही काळाची गरज आहे. यासाठी राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राज्यात राबविण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

जिल्ह्यास्तरावर समिती स्थापन करून त्यांच्याद्वारे सदर उपक्रमावर देखरेख करून आवश्यक अहवाल आयुक्त महिला व बाल विकास यांचे मार्फत मा. प्रधान सचिव , महिला व बाल विकास विभाग यांना सादर करतील.

या प्रकल्पाच्या अंमलबजावणी मध्ये पक्ष १ व पक्ष २ या दोहोंची प्रमुख भूमिका राहिल व त्याचा तपशील खालील प्रमाणे असेल :-

**पक्ष १ ची भूमिका व जबाबदार्या –**

१) सदरील प्रकल्पाकरीता एकंदरीतच नोडल agency म्हणून भूमिका निभावणे.

२)	सदर प्रकल्पाची रूपरेषा जिल्हास्तरीय समिती यांना स्पष्ट करून त्यांचे सहकार्य या कामी मिळेल या दृष्टीने आदेश निर्गमित करणे.

३)	परीक्षणासाठी येणाऱ्या तज्ञ व्यक्तीच्या येण्या-जाण्याची तसेच निवासाची व्यवस्था करणे.

४)	या कार्यक्रमासाठी तज्ञ प्रशिक्षक पुरविणे.

५)	प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी होणाऱ्या युवक युवतींना सहभाग प्रमाणपत्र देणे.

६)	या प्रकल्पाच्या देखरेखीसाठी राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर समिती स्थापन करणे.

**पक्ष २ ची भूमिका व जबाबदार्या –**

१)	सदर कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी युवक – युवती उपलब्ध करून देणे .

२)	जागा/मैदान/हॉल उपलब्ध करून देणे.

३)	विद्यापीठ स्तरावरून आवश्यक ते आदेश निर्गमित करणे व स्थानिक पातळीवर नियोजनात लक्ष देणे.

दोन्ही पक्षवरील व्यवस्थेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी अटी व शर्ती आणि कार्यप्रणाली परिभाषित करण्याच्या उद्देशाने हा सामंजस्य करारखालील प्रमाणे करत आहे,

**लागू दिनांक** : सदर सामंजस्य करार स्वाक्षरी झालेल्या दिनांकापासून लागू राहील

**दस्ताऐवज राखून ठेवणे:** या प्रकल्पाचे वेळोवेळी monitoring करणे व प्रकल्पाच्या फलश्रुतीचे अहवाल तयार करणे हि दोन्ही पक्षांची जबाबदारी राहील.

**तडजोडीचे प्रश्न:-**

दोन्ही पक्षात वाद व प्रश्न उद्भवल्यास आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय तसेच **कुलसचिव,** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे परस्पर समन्वयाने सोडवतील. तसे न झाल्यास मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या द्वारे घेण्यात येणारे निर्णय दोन्ही पक्षांना मान्य असतील.

साक्षीदारासमोर दोन्ही पक्षांनी 26/6/2023 या तारखेला या करारावर सह्या केलय केल्या.

| | |
|---|---|
| **कुलसचिव,**<br>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ<br><br>सही आणि पत्ता -<br>ज्ञानतीर्थ नगर, केगाव,<br>सोलापूर -पुणे महामार्ग, सोलापूर 413255 | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सोलापूर<br><br>सही आणि पत्ता<br>1608/09, शोभा नगर, सात रस्ता, सोलापूर 3003 |
| नांव : योगिनी घारे | नांव : डॉ. विजय खोमणे, |
| सही 26/6/23 | सही |
| अधिकृत शिक्का : **कुलसचिव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.** | अधिकृत शिक्का : |
| पत्ता : ज्ञानतीर्थ नगर, केगाव,<br>सोलापूर – पुणेमहामार्ग, सोलापूर 413255 | पत्ता : 1608/09, शोभा नगर, सात रस्ता, सोलापूर 3003 |